# कार्यकारी सारांश

## १.१ पार्श्वभूमी

१.१.१ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (एम.एस.ई.टी.सी.एल.) ही राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) असून राज्य पारेषण यंत्रणेचे नियोजन, विकास, संचालन आणि देखभाल करण्यासाठी जबाबदार आहे. जेणेकरून वीज स्त्रोतांपासून भार केंद्रांपर्यंत वीज पारेषण सुलभ करता येईल. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (एम.एस.ई.टी.सी.एल.) ही महाराष्ट्र सरकारच्या मालकीची पूर्णतः स्वायत्त कॉर्पोरेट संस्था आहे आणि कंपनी कायदा, जून २००५ अंतर्गत स्थापन करण्यात आलेली आहे. वीज अधिनियम २००३ च्या कलम ३९ (१) अंतर्गत ही संस्था स्थापन करण्यात आलेली आहे.

१.१.२ विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३१ आणि कलम ३९ (१) अंतर्गत राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) ची भूमिका आणि कार्ये पुढीलप्रमाणे नमूद आहेत:

*कलम ३९: (राज्य पारेषण उपक्रम आणि कार्ये):*

*(1) राज्य सरकार मंडळ किंवा एखाद्या शासकीय कंपनीला खालील अटीवर राज्य पारेषण उपक्रम म्हणून अधिसूचित करू शकते:*

*राज्य पारेषण उपक्रम वीज व्यापार व्यवसायात सहभागी होणार नाही.*

*तसेच पुढे असे नमूद करण्यात येते की, राज्य सरकार अशा राज्य पारेषण उपक्रमास संबंधित मालमत्ता, मालमत्तेतील स्वारस्य, हक्क व जबाबदाऱ्या आणि वीज पारेषणाशी संबंधित कर्मचारी, कंपन्या अधिनियम, १९५६ अंतर्गत समाविष्ट करण्यात येणाऱ्या कंपनी किंवा कंपन्यांना हस्तांतरित करू शकते आणि त्यांना भाग XIII अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या पद्धतीनुसार हस्तांतरण योजनेद्वारे पारेषण परवाना धारक म्हणून कार्य करण्यासाठी अशा कंपनी किंवा कंपन्या या अधिनियमांतर्गत पारेषण परवाना धारक मानल्या जातील.*

१.१.३ १ ऑगस्ट २०१९ रोजी माननीय आयोगाने मागील बहुवर्षीय दर (एम.वाय.टी) विनियम २०१९ जारी केले होते. बहुवर्षीय दर (एम.वाय.टी) विनियम २०१९ मधील निर्देशांनुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (एम.एस.ई.टी.सी.एल.) ने त्यांच्या वार्षिक महसूल गरजा (ARR) चौथ्या नियंत्रण कालावधी, म्हणजेच आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीच्या अंदाजपत्रकासाठी याचिका सादर केली होती व त्यात राज्य पारेषण उपक्रमाच्या (एस.टी.यू.) महसूल गरजांचे अंदाजपत्रक देखील समाविष्ट करण्यात आले होते. आदरणीय आयोगाने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (एम.एस.ई.टी.सी.एल.) द्वारे दाखल केलेल्या याचिकेबाबत प्रकरण क्रमांक ३०२/२०१९ संदर्भात ३० मार्च २०२० रोजी आदेश दिले होते.

१.१.४ माननीय आयोगाने १९ ऑगस्ट २०२४ रोजी बहुवर्षीय दर (एम.वाय.टी) अधिनियमन, २०२४ सूचित केले आहे. बहुवर्षीय दर (एम.वाय.टी) नियम २०२४ नुसार आदरणीय आयोगाच्या निर्देशांप्रमाणे, राज्य पारेषण उपक्रमास (एस.टी.यू.) आर्थिक वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० या पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी शुल्क आणि आकारणीसाठी स्वतंत्र याचिका दाखल करणे बंधनकारक आहे. राज्य पारेषण उपक्रमाने (एस.टी.यू.) सादर केलेल्या याचिकेत आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२४-२५ यासाठी वाटप विवरणपत्रे आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० या नियंत्रण कालावधीसाठीच्या अंदाजाचे समावेश आहेत.

## १.२ वर्तमान याचिका

१.२.१ सदर याचिकेत बहुवर्षीय दर (एम.वाय.टी) नियम २०२४ मध्ये नमूद केलेल्या मा. आयोगाच्या तत्त्वांनुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० या पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी दीर्घकालीन, मध्यमकालीन आणि अल्पकालीन पारेषण यंत्रणा वापरकर्त्यांसाठी राज्य पारेषण उपक्रमाने (एस.टी.यू.) अंदाजे शुल्क आणि दराच्या आकारणीसाठी मान्यता मागितली आहे.

१.२.२ राज्य पारेषण उपक्रमाने (एस.टी.यू.) बहुवर्षीय दर (एम.वाय.टी) नियम २०२४ च्या तरतुदींनुसार आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२३-२४ या कालावधीतील खर्च विभाजित केले तसेच आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० या कालावधीसाठी एकत्रित वार्षिक महसूली गरजांचे (ARR) अंदाज सादर केला आहे. या याचिकेसोबत राज्य पारेषण उपक्रमाने (एस.टी.यू.) आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२३-२४ या कालावधीसाठी विभाजित खाती (Segregated Account) आणि वाटप निवेदन (Allocation Statement) सादर करत आहे.

१.२.३ बहुवर्षीय दर (एम.वाय.टी) विनियम २०२४, नियम ४ चा सारांश खालील प्रमाणे:

*बहु-वर्षीय वीज दराची चौकट, निर्मिती कंपनी, ऊर्जा साठवण यंत्रणा विकासक (इएसएसडी), पारेषण परवानाधारक, वितरण वायर व्यवसाय आणि विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसाय, यांच्याकरिता एकूण महसुलाची गरज आणि वीज दर व आकारांपासूनच्या अपेक्षित महसुलाची आणि एमएसएलडीसीच्या शुल्क आणि आकार आणि एसटीयुच्या शुल्क आणि आकार यांची परिगणना करण्यासाठी, खालील घटकांवर आधारीत असेलः-*

*(1) अंदाजित एकूण महसुली गरज, विद्यमान वीज दर किंवा एमएसएलडीसी आणि एसटीयुच्या बाबतीत शुल्क व आकारांपासून अपेक्षित महसूल, अपेक्षित महसुली तूट, आणि नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरीता प्रस्तावित वीज दर किंवा शुल्क आणि आकार, असणारी बहु-वर्षीय वीज दराची याचिका निर्मिती कंपनी किंवा इएसएसडी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी किंवा एसटीयु यांच्याकडून सादर करण्यात येईल;*

*परंतु असे की, वितरण परवानाधारक नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी वर्गवारी-निहाय वीज दर प्रस्तावित करेल.*

*परंतु आणखी असे की, कामगिरीचे मापदंड, ज्यांच्या मार्गदर्शिका या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आहेत त्यांच्या आधारे, संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी एकूण महसुली गरजेचा अंदाज करण्यात येईल.*

*(2) नियंत्रण कालावधीच्या सुरुवातीला, नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी आयोगाकडून निर्मिती कंपन्या, इएसएसडी, पारेषण परवानाधारक, वितरण वायर्स व्यवसाय, विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसाय, आणि एमएसएलडीसी, आणि एसटीयु यांच्याकरिता एकूण महसुली गरज आणि वीज दर किंवा शुल्क व आकार निश्चित करणे;*

*परंतु असे की, आयोग, नियंत्रण कालावधीसाठी पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमधील एमएसएलडीसीच्या शुल्क आणि आकारांच्या आणि एसटीयुच्या शुल्क आणि आकारांच्या विभागणीच्या प्रमाणास देखील मान्यता देईल;*

१.२.४ याशिवाय बहुवर्षीय दर (एम.वाय.टी) विनियम २०२४, नियमावलीच्या नियमन ५.१ (अ) अंतर्गत देखील असे नमूद करण्यात आले आहे की:

*५.१ या विनियमांखाली नियंत्रण कालावधीमध्ये दाखल करावयाच्या याचिका खालीलप्रमाणे आहेत:*

*ए) या विनियमांनुसार सर्व दृष्टीने परिपूर्ण असलेली बहु-वर्षीय वीज दराची याचिका निर्मिती कंपन्या आणि पारेषण परवानाधारक आणि इएसएसडी आणि एमएसएलडीसी आणि एसटीयु यांच्याकडून १ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत आणि वितरण परवानाधारकांकडून ३० नोव्हेंबर, २०२४ पर्यंत दाखल करण्यात येईल. यामध्ये खालील बाबींचा समावेश असेलः*

*1) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१९ अंतर्गत करावयाचे आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता अचूक समायोजन;*

*परंतु असे की, आर्थिक वर्ष २०२२-२३ पूर्वीच्या वर्षाचे अचूक समायोजन अद्याप पूर्ण व्हावयाचे असेल तर त्या वर्षीचे अचूक समायोजन आयोग, जर त्यास उचित वाटले तर, आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या अचूक समायोजनासोबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१९ अंतर्गत करील;*

*2) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१९ अंतर्गत करावयाचे आर्थिक वर्ष २०२४-२५ करीता तात्पुरते अचूक समायोजन;*

*3) या विनिमयांतर्गत नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी एकूण महसुली गरज;*

*4) या विनिमयांतर्गत नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी विद्यमान वीज दर आणि आकारांपासून विजेच्या विक्रीतून मिळालेला महसूल आणि अंदाजित महसुली तूट;*

*5) या विनिमयांतर्गत नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी प्रस्तावित वर्गवारी-निहाय वीज दर किंवा शुल्क व आकार;*

१.२.५ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०१९ च्या तरतुदींनुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (एम.एस.ई.टी.सी.एल.) ने *आर्थिक वर्ष* २०२२-२३ आणि *आर्थिक वर्ष* २०२३-२४ साठी एकत्रित वार्षिक महसूल गरजा (ARR) च्या ट्रू-अपची प्रस्तुतीकरण केली आहे, जे लेखापरीक्षित वार्षिक निवेदनांनुसार आहे, तसेच *आर्थिक वर्ष* २०२४-२५ साठी तात्पुरते ट्रू-अप सादर केले आहे. *आर्थिक वर्ष* २०२४-२५ पर्यंत राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) द्वारे केलेला सर्व खर्च बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०१९ च्या लागू होण्याच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (एम.एस.ई.टी.सी.एल.) च्या याचिकेचा भाग असेल. तथापि, या याचिकेत राज्य पारेषण उपक्रमाने (एस.टी.यू.) *आर्थिक वर्ष* २०१९-२० ते *आर्थिक वर्ष* २०२३-२४ या वर्षांसाठी वाटप पत्रकाच्या आधारे राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) कडून झालेल्या खर्चाची माहिती सादर करीत आहे.

१.२.६ माननीय आयोगाने, बहु-वर्षीय वीज दर विनियम २०२४ च्या नियमन २.१(१) अंतर्गत, राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) साठी "लेखा विवरण" या संज्ञेची व्याख्या नमूद केली आहे, ज्याची तरतूद खालीलप्रमाणे आहे:

*२.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तरः-*

*(१) "लेखा विवरणपत्र" म्हणजे प्रत्येक वर्षाकरिता, खालील विवरणपत्रे म्हणजेच*

*(1) आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या नमुन्यानुसार प्रत्येक परवानाप्राप्त किंवा विनियमित व्यवसायाच्या संदर्भात वेगवेगळा तयार केलेला, वैधानिक लेखापरीक्षकांनी उचितपणे प्रमाणित केलेला, ताळेबंद;*

*(2) आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या नमुन्यानुसार प्रत्येक परवानाप्राप्त किंवा विनियमित व्यवसायाच्या संदर्भात वेगवेगळा तयार केलेला, वैधानिक लेखापरीक्षकांनी उचितपणे प्रमाणित केलेला, नफा-तोटा लेखा;*

*(3) आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या नमुन्यानुसार प्रत्येक परवानाप्राप्त किंवा विनियमित व्यवसायाच्या संदर्भात वेगवेगळे तयार केलेले, वैधानिक लेखापरीक्षकांनी उचितपणे प्रमाणित केलेले, रोकड आवक-जावक विवरणपत्र;*

*……………………*

*परंतु असे की, परवान्याच्या अटींनुसार प्रत्येक परवानाप्राप्त व्यवसाय आणि प्रत्येक विनियमित व्यवसायासाठी वेगवेगळी लेखा विवरणपत्रे तयार करुन आयोगाला सादर करण्यात येतील;*

*परंतु आणखी की, परवान्याच्या अटीनुसार प्रत्येक परवानाप्राप्त व्यवसायासाठी आणि प्रत्येक विनियमित व्यवसायासाठी आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून वेगवेगळी लेखा विवरणपत्रे सादर करण्यात आली नाहीत तर, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी किंवा एसटीयु यांनी दाखल केलेल्या याचिका, याचिकाकर्त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आयोगाकडून फेटाळल्या जाऊ शकतील;*

*परंतु आणखी असेही की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी किंवा एसटीयु लेखा विवरणपत्रांसह वैधानिक लेखापरीक्षकाचे अभिप्राय, निरीक्षणे आणि लेख्यांवरील टिपण्या सादर करतील आणि त्यासोबत वैधानिक लेखापरीक्षकांनी अधोरेखित केलेल्या महत्वाच्या प्रश्नांचा सारांश आणि असे प्रश्न सोडवण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची माहिती देखील जोडण्यात येईल;*

*परंतु असेही की, स्थानिक प्राधिकरणातर्फे वीज वितरणाचा व्यवसाय करण्यात येत असल्यास, लेखा विवरणपत्रे यांचा अर्थ अशा स्थानिक प्राधिकरणाने, त्यास लागू असलेल्या संबधित संविधीनुसार, वर उल्लेख केलेल्या बाबींच्या संदर्भात तयार केलेली व ठेवलेली माहिती;*

*परंतु असेही की, महाराष्ट्र राज्य विद्युत भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) आणि एसटीयु जोपर्यंत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड आणि एसटीयुचा भाग असेल तोपर्यंत एमएसएलडीसी आणि एसटीयुकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला वेगळी लेखा पुस्तके ठेवावी लागतील आणि ही लेखा पुस्तके वैधानिक लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षित व प्रमाणित करुन घ्यावी लागतील;*

*परंतु आणखी असेही की,* राज्य पारेषण उपक्रम *करिता वेगळी लेखा पुस्तके ठेवण्यात येत नाहीत तोपर्यंत, हा कालावधी या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक वर्षापेक्षा जास्त नसावा, तोपर्यंत राज्य* पारेषण उपक्रम *बहु-वर्षीय वीज दर याचिका दाखल करण्याच्या प्रयोजनासाठी वैधानिक लेखापरीक्षकाने यथोचित प्रमाणित केलेल्या लेखापरीक्षित लेख्यासह मत्ता, दायित्वे, महसूल आणि* राज्य पारेषण उपक्रमाच्या *कामकाजासाठीचा खर्च आणि त्याचे ताळमेळ विवरणपत्र समाविष्ट असणाऱ्या वाटप विवरण पत्राच्या आधारावर अंतरीम लेखे सादर करेल.*

१.२.७ वरील निर्देशांनुसार, या याचिकेमध्ये राज्य पारेषण उपक्रमाने (एस.टी.यू.) त्यांच्या कामकाजासाठीचा मालमत्ता, दायित्वे, महसूल आणि खर्च यांचा समावेश असलेल्या वाटप विवरणावर आधारित अंतरिम लेखे सादर केले आहेत आणि त्याचे लेखापरिक्षा (Audit) केलेल्या लेखांसह ताळमेळ विवरणपत्र सनदी लेखापाल कडून (Chartered Accountant) प्रमाणित करून सादर केले आहे. याचिकेसोबत संबंधित दाखले देखील जोडले आहेत.

१.२.८ मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या बहु-वर्षीय वीज दर विनियम 2024 च्या तरतुदींनुसार, आर्थिक वर्ष 2025-26 ते आर्थिक वर्ष 2029-30 या पाचव्या नियंत्रण कालावधीसाठीच्या अंदाजपत्रके स्वतंत्रपणे राज्य पारेषण उपक्रमाने (एस.टी.यू.) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (एम.एस.ई.टी.सी.एल.) साठी सादर केली आहेत.

१.२.९ आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० या पाचव्या नियंत्रण कालावधीसाठीच्या राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) च्या वार्षिक निश्चित शुल्काचा सारांश खाली दिलेला आहे:

**तक्ता क्रमांक १.**

आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० या मुदतीसाठी राज्य पारेषण उपक्रम यांचे वार्षिक स्थिर दर यांचा सारांश (AFC):

(रु. लाखात)

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **२०२५-२६** | **२०२६-२७** | **२०२७-२८** | **२०२८-२९** | **२०२९-३०** |
| | | **प्रक्षेपित** | **प्रक्षेपित** | **प्रक्षेपित** | **प्रक्षेपित** | **प्रक्षेपित** |
| १ | संचलन (प्रवर्तन) व सुव्यवस्था देखभालसाठी खर्च | १,३१०.५८ | १,३९५.४४ | १,४६०.७७ | १,५२९.१६ | १,६००.७४ |
| २ | घसारा खर्च | ५३.८५ | ५८.६१ | ६४.९६ | ७९.२५ | ७७.७५ |
| ३ | भांडवली कर्जाचे व्याज | ४.०२ | ६.२९ | २.८० | ०.५३ | - |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १९.३६ | २०.४९ | २१.०९ | २१.८१ | २२.३४ |
| ५ | **एकूण महसूली खर्च** | **१,३८७.८१** | **१,४८०.८३** | **१,५४९.६२** | **१,६३०.७४** | **१,७००.८३** |
| ६ | समभाग भांडवलाचा परतावा | ४.२० | ९.०२ | १०.४९ | १३.२२ | १५.११ |
| ७ | कामगीरीशी संलग्न प्रोत्साहन - अभिदान | २६.२२ | २७.५६ | २७.८९ | २८.४४ | २८.४३ |
| ८ | राज्य पारेषण उपक्रमाचा एकूण खर्च | ३०.४२ | ३६.५८ | ३८.३८ | ४१.६६ | ४३.५४ |
| ९ | वजा: वीजदरा व्यतिरीक्त उत्पन्न | ०.३१ | ०.३२ | ०.३४ | ०.३५ | ०.३७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | वजा: मुक्त प्रवेश आकारासाठीच्या अर्जापासून उत्पन्न जनरल नेटवर्क ॲक्सेस. | ५४३.९१ | ५९८.३१ | ६५८.१४ | ७२३.९५ | ७९६.३४ |
| **११** | **राज्य पारेषण उपक्रमसाठी वार्षिक स्थिर दर (AFCs).** | **८७४.०१** | **९१८.७८** | **९२९.५२** | **९४८.१०** | **९४७.६६** |

**२.१ प्रार्थना**

**राज्य पारेषण उपक्रम सन्माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे विनम्रपणे प्रार्थना करीत आहे की;**

२.१.१ बहुवर्षीय दर (एम.वाय.टी) विनियमन २०२४ नुसार, नियम ५.१ अंतर्गत, राज्य पारेषण उपक्रमाने (एस.टी.यू.) ने १ नोव्हेंबर २०२४ पर्यंत बहुवर्षीय दरासाठी याचिका दाखल करावी आणि १ नोव्हेंबर २०२९ पर्यंत ट्रू उप याचिका (True-up Petition) दाखल करावी. वितरण परवाना धारकांना मध्यमकालीन पुनरावलोकन याचिका (Mid-term Review Petition) दाखल करण्याची परवानगी आहे तसेच राज्य पारेषण उपक्रमाला (एस.टी.यू.) मध्यमकालीन पुनरावलोकन याचिका (Mid-term Review Petition) दाखल करण्याचा कोणतीही तरतूद नाही. म्हणून विनंती करण्यात येत आहे की, राज्य पारेषण उपक्रमाला (एस.टी.यू.) पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी वास्तविक मूल्यांच्या आधारे त्यांचे शुल्क आणि आकारणी पुनरावलोकन व सुधारित करण्याची परवानगी द्यावी, जेणेकरून त्यांना त्यांच्या पहिल्या याचिकेसाठी मोठे बदल टाळता येतील.

२.१.२ बहुवर्षीय दर (एम.वाय.टी) २०२४ नियमाच्या, नियमन २.१ अंतर्गत, राज्य पारेषण उपक्रमाला (एस.टी.यू.) बहु-वर्षीय वीज दर याचिका दाखल करण्याच्या प्रयोजनासाठी वैधानिक लेखापरीक्षकाने यथोचित प्रमाणित केलेल्या लेखापरीक्षित लेख्यासह मालमत्ता, दायित्वे, महसूल आणि राज्य पारेषण उपक्रमाच्या कामकाजासाठीचा खर्च आणि त्याचे ताळमेळ विवरणपत्र समाविष्ट असणाऱ्या वाटप विवरण पत्राच्या आधारावर अंतरीम लेखे सादर करणे आवश्यक आहे, जे विधीमान्य लेखा परीक्षकांनी प्रमाणित केलेले असावे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (एम.एस.ई.टी.सी.एल.) साठी विधीमान्य लेखा परीक्षकांची नियुक्ती भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (CAG) द्वारे करण्यात आली आहे, तसेच मागील आर्थिक वर्षांचे (वित्तीय वर्ष २०१९-२० ते वित्तीय वर्ष २०२३-२४) प्रमाणित चाचणी ताळेबंद (Trial Balance - TB) एम.एस.ई.टी.सी.एल.कडून आधीच सादर केला गेला आहे आणि वित्तीयदृष्ट्या पूर्ण झाला आहे. वरील गोष्टींच्या अनुषंगाने, राज्य पारेषण उपक्रमाची (एस.टी.यू.) पहिल्या याचिकेसाठी,

मागील वर्षांचे वाटप निवेदन सनदी लेखापाला (Chartered Accountant) द्वारे प्रमाणित करून सादर करण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती आहे.

२.१.३ बहुवर्षीय दर विनियमन, (एम.वाय.टी) २०२४ नियम १३४.२ नुसार, पारेषण उपभोगत्यांकडून राज्य पारेषण उपक्रमास (एस.टी.यू.) देय वार्षिक शुल्कांच्या गणनेसाठी समायोजित आधार पारेषण क्षमतेची (Adjusted Base Transmission Capacity Requirement - TCR) आवश्यकता निश्चित करणे अनिवार्य आहे. सदर आधार पारेषण क्षमता हक्क (TCR) मधून आंशिक मुक्त प्रवेश (Partial Open Access - POA) साठीची बिल केलेली मागणी वजा करून ठरवले जाते. पारेषण उपभोगत्यांकडून (AEML-D आणि TPC-D) आंशिक मुक्त प्रवेश (POA) साठीची बिल केलेली मागणी उपलब्ध नसल्यामुळे समायोजित आधार (Adjusted Base TCR) चुकीच्या पद्धतीने मोजली जाईल आणि त्यामुळे राज्य पारेषण उपक्रमाच्या (एस.टी.यू.) शुल्कांच्या वाटपावर विपरित परिणाम होईल. यासाठी मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे विनंती आहे की पारेषण उपभोगत्यांना आंशिक मुक्त प्रवेश (POA) साठीची बिल केलेली मागणी १५ मिनिटांच्या वेळेच्या गटानुसार (15 Minutes Timeblock) मोजमापाचे माहिती राज्य पारेषण उपक्रमाला (एस.टी.यू.) पुरवण्यासाठी वितरण परवाना धारकाला योग्य मार्गदर्शक तत्त्वे व प्रणाली तयार करावी, जेणेकरून वित्तीय वर्ष २०२५-२६ पासून समायोजित आधार (Adjusted Base TCR) चे अचूक गणन होऊ शकेल.

२.१.४ राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.), माननीय आयोगाकडे या सादर केलेल्या याचिकेत भाग म्हणून तक्ता क्र. ७४ मध्ये प्रस्तावित केलेले वीज यंत्रणा जोडणी शुल्क आणि खुला प्रवेश शुल्क यांना मंजूर करण्याची विनंती करत आहे.

२.१.५ माननीय आयोगाने ५ व्या नियंत्रण कालावधीसाठी राज्य पारेषण उपक्रमाची (एस.टी.यू.) शुल्क आणि दर निश्चित करण्याच्या याचिकेच्या मंजुरीसाठी वापरलेला कार्यक्षम एक्सेल मॉडेल उपलब्ध करुन द्यावे ही विंनती.

२.१.६ राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) माननीय आयोगाकडे विनंती करते की, कोणत्याही त्रुटी/ कमतरता माफ करून राज्य पारेषण उपक्रमाला (एस.टी.यू.) आवश्यक असलेल्या अतिरिक्त माहिती/ डेटा पुढे सादर करण्याची परवानगी देण्यात यावी. कारण राज्य पारेषण उपक्रमाकडून (एस.टी.यू.) ही पहिल्यांदाच याचिका सादर होत आहे, त्यामुळे आम्ही माननीय आयोगाकडे राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) साठी मार्गदर्शन दुरुस्तीचे (Course Correction) तरतूद करण्याची विनंती करते.

२.१.७ राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) माननीय आयोगाकडे विनंती करतो की ५ व्या नियंत्रण कालावधीसाठी राज्य पारेषण उपक्रम (एस.टी.यू.) कडून आकारले जाणारे शुल्क आणि दर निश्चित करण्यासाठी याचिकेला मंजुरी देण्यात यावी.